ARTHA · Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3134. Licence No. 53.

वर्ष ११ | पुणें, बुधवार तारीख २३ फेब्रुवारी, १९५५ | अंक ८

## विविध माहिती

**सौराष्ट्र सरकारला देणगी**—जामनगर येथील धनिक श्री. मेघजीभाई ह्यांनीं सौराष्ट्र सरकारला १ कोटी रुपयांची देणगी दिली आहे. देणगीच्या रकमेचा विनियोग लोकहितार्थी कामें करणाऱ्या संस्था स्थापन करण्यासाठीं व्हावयाचा आहे. सौराष्ट्र सरकारनें देणगीचा स्वीकार केला आहे. श्री. मेघजीभाई पूर्व आफ्रिकेंत स्थायिक झालेले आहेत.

**तिकिटावांचून प्रवास करणारे**— १९५३-५४ सालीं भारतीय रेल्वेमार्गावर विनातिकिट प्रवास करणाऱ्यांची संख्या ६९,५७,२२५ इतकी आढळून आली. त्यापूर्वीच्या वर्षांत अशा प्रवाशांची संख्या ८४,१५,०८८ इतकी होती. फुकटया प्रवाशां-पासून वसूल करण्यांत आलेली रक्कम अनुक्रमें १,४५,१२,५०१ रु. आणि १,६६,६८,०७३ रु. अशी आहे. फुकट प्रवासी शोधून काढण्यासाठी सर्व रेल्वेजनीं खास उपाय योजले होते.

**ब्रिटिश स्त्रियांचें धाडस**—नेपाळ सरकारनें 'ब्रिटिश लेडीज स्कॉटिश क्लाइंबिंग क्लब' ह्या संस्थेच्या सभासदांना हिमालयांतील 'जुगल' शिखरावर आरोहण करण्याची परवानगी दिली आहे. हिमालयांतील शिखर गांठण्याचा स्त्रियांनीं केलेला हा पहिलाच प्रयत्न होईल. आरोहकांत ४ स्त्रिया आहेत. शिखराची उंची २३,००० फूट आहे.

**बंगलोर येथें खाजगी वैद्यकीय कॉलेज**—बंगलोर येथें नव्यानें स्थापन करण्यांत आलेल्या एका संस्थेतर्फे वैद्यकीय शिक्षणाचें खाजगी कॉलेज काढण्यांत येणार आहे. ह्या उपक्र-माला म्हैसूर सरकारचा पाठिंबा आहे. राज्यांतील सेवानिवृत्त सरकारी डॉक्टर्स व नामवंत खाजगी डॉक्टर्स ह्यांनीं मिळून नवें कॉलेज चालविण्याचें ठरविलें आहे.

**चहा न घेण्याची मोहीम**—दोन महिन्यांपूर्वी सौराष्ट्रामधील कांहीं खेड्यांतील लोकांनीं चहा न घेण्याच्या शपथा घेतल्या व ह्या मोहिमेचा प्रचार चालू केला. आतां ह्या मोहिमेचें लोण उत्तर गुजराथमधील २० खेड्यांपर्यंत पोंचलें आहे. विरमगांव तालुक्यांतील एका खेड्याच्या लोकांनीं तर ग्रामपंचायतीनेंच गांवांतील चहाचीं दुकानें बंद करावीं, अशी विनंति केली आहे.

**फोर्ड फौंडेशनकडून मिळालेली मदत**—भारतामधील आर्थिक व सामाजिक विकासाच्या कार्याला मदत म्हणून अमेरिकेंतील फोर्ड फौंडेशन ह्या संस्थेनें १९५१ सालापासून ८० लाख डॉलर्सची रक्कम दिली आहे. निरनिराळ्या प्रकारच्या ३३ विकास योजनांना वरील रकमेंतून मदत मिळालेली आहे. खेड्यांची सुधारणा करण्यासाठी यावयाच्या शिक्षण-केंद्रांसाठी सर्वांत जास्त म्हणजे २० डॉलर्सची रक्कम एका मुठीनें देण्यांत आली.

**मद्रास राज्यांतील भूदान चळवळ**—मद्रास राज्याचे मुख्य मंत्री, श्री कामराज नाडर मदुरा जिल्ह्यांत भूदानाच्या प्रचारासाठीं गेले होते. त्यांना दोन दिवसांत १,५०० एकर जमिनीचें दान मिळालें. त्यापैकीं २०० एकर जमीन त्यांनीं गरीब शेतकऱ्यांत वांटून दिली. वांटलेल्या जमिनींपैकीं एक तृतीयांश जमीन स्वतःची मुळींच जमीन नसलेल्या हरिजन कुटुंबांना देण्यांत आली.

**सरहद्दीजवळील भूभागाचा विकास**—उत्तर प्रदेशाच्या तिबेटला लागून असलेल्या सरहद्दीजवळच्या भागांचा विकास करण्यासाठी राज्य सरकारनें एक योजना तयार केली आहे. तिची अंमलबजावणी पुढील आर्थिक वर्षांत होईल. सर्व योजना पुरी होण्यास १,३६,००,००० रुपये खर्च येईल. चालू वर्षांत ह्या भागांसाठी १५,००० रुपये खर्च करण्यांत येतील.

**लग्नप्रसंगीं लागणारें सोनें व चांदी**—भारतांत दरवर्षी होणाऱ्या विवाहांच्या निमित्तानें १५० कोटी रुपयांच्या सोन्याचें अगर चांदीचें दागिन्यांत रूपांतर करण्यांत येतें. ह्यापैकीं कांहीं धातू दागिन्यांसाठी लागणाऱ्या चिपांच्या स्वरूपांत असतो. दरवर्षी सुमारें ५ कोटी मुलींचीं लग्नें होतात व त्यांच्या दागिन्यांसाठी अंदाजे १२५ कोटी रुपयाचे मौल्यवान् धातू लागतात.

**मागासलेल्या जातीच्या मुलांना दूध**—सुरत जिल्ह्यांत सोनगड व व्यारा या दोन ठिकाणीं मागासलेल्या जातींच्या विद्यार्थ्यांचीं दोन वसतिगृहें आहेत. वसतिगृहांतील मुलांना मोफत दूध पुरविण्याचें मुंबई सरकारनें ठरविलें आहे. ह्या कामासाठी लागणाऱ्या गाई विकत घेण्यासाठी व त्यांचे गोठे बांधण्यासाठी मुंबई सरकारनें ५,००० रुपयांची रक्कम मंजूर केली आहे.

**राजस्थानमधील लोकांचें सहकार्य**—राजस्थानमधील नॅशनल एक्स्टेन्शन सर्व्हिसला लोकांकडून चांगला पाठिंबा मिळत आहे. गेल्या डिसेंबरअखेर पूर्ण झालेल्या ९ महिन्यांत लोकांनीं केलेल्या मदतीची पैशांतील किंमत सुमारें १५ लाख रुपये भरली. विकास योजना १९५२ सालीं सुरू करण्यांत आली. तेव्हांपासून आतांपर्यंत श्रम, पैसा, अगर साधनें ह्यांच्या रूपानें लोकांनीं २५ लाख रुपये दिले.

**बिहारमधील पाटबंधारे**—बिहार राज्यांतील गया जिल्ह्यांत पाटबंधाऱ्यांचीं ५ मोठीं कामें पूर्ण करण्यांत आलीं आहेत. पाटबंधारे बांधल्यामुळें सुमारें ५०,००० एकर जमिनीला पाण्याचा हुकमी पुरवठा होऊं लागेल. सर्व कामासाठीं मिळून राज्य सरकारला १६.५ कोटी रुपये खर्च आला.

## रूरल क्रेडिट सर्व्हे रिपोर्टावर हिंदी सहकारी चळवळीचें प्रातिनिधिक मत

### " सरकारी भागीदारी आली, तरी सरकारला गैरवाजवी अधिकार नकोत "

ऑल इंडिया को-ऑपरेटिव्ह युनियनच्या एक्झिक्युटिव्ह कमिटीची सभा दि. १८ फेब्रुवारी रोजीं मुंबई येथें युनिअनचे प्रेसिडेंट श्री. आर. जी. सरय्या ह्यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती. रिझर्व्ह बँकेनें नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या ऑल इंडिया रूरल क्रेडिट सर्व्हेचा विचार सभेनें केला. रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर, श्री. बी. रामराव ह्यांनीं प्रास्ताविक भाषण केलें. सभेस कमिटी ऑफ डायरेक्शनचे सभासद श्री. बी. वेंकटप्पय्या आणि डॉ. एन्. एस्. आर. शास्त्री, अमेरिकन सहकारी चळवळीचे प्रातिनिधि मि. वाल्टर एल्. क्रॉफर्ड व मि. टॉमस बी. कीन्ह, टेक्निकल को-ऑपरेशन मिशनचे मि. जॉन विल्की, श्री. वैकुंठराय मेहता, इत्यादि सभेस उपस्थित होते.

शेतीच्या विकासाची गति अधिक वेगाची करण्यासाठी सहकारी चळवळीच्या द्वारां शेतकऱ्यांना अधिक उत्कटतेनें सरकारनें साहाय्य करणें जरूरीचें आहे, असें मत एक्झिक्युटिव्ह कमिटीनें पूर्ण चर्चेचे अंतीं व्यक्त केलें. " देशाच्या पतीची व आर्थिक व्यवहारांची संघटना सहकारी पायावर करण्याखेरीज दुसरा मार्गच नाहीं " असा रिपोर्टकर्त्यांचा विचार परिस्थितीचा काळजीपूर्वक अभ्यास केल्यावर झाला, ह्याची कमिटीनें समाधानपूर्वक नोंद घेतली. सरकारी योजना अंमलांत आणण्यासाठी सहकारी चळवळ जरूर आहे हें मान्य करण्यांत आल्यानंतर, सरकारचें कांहीं स्वरूपांत सहकार्य, इतकेंच नव्हे तर भागीदारीसुद्धां, एक्झिक्युटिव्ह कमिटीला स्वागतार्ह वाटली; मात्र त्यामुळें संस्थांचें सहकारी स्वरूप नष्ट होतां कामा नये, किंवा सहकारी चळवळींतील कार्यकर्त्यांचें विचारस्वातंत्र्य नाहींसें होतां कामा नये, असा कमिटीचा आग्रह आहे. सहकारी संस्थांचें जरूर तेवढें भांडवल सरकारनें घ्यावें, परंतु सत्ता किंवा मार्गदर्शन ह्याबाबत त्याला गैरवाजवी अधिकार असूं नयेत, म्हणजे वरील हेतु साध्य होईल असें कमिटीला वाटतें. सरकारी धोरण अंमलांत येत आहे, हें पहाण्यासाठी सहकारी संस्थांच्या बोर्डावर दोन अथवा तीन सभासद सरकारनें नियुक्त करावेत, पण सहकारी तत्त्वांप्रमाणें त्या सर्वांना मिळून एकच मत देतां यावें. रिलिफ व गॅरंटी फंडस्, स्टॅबिलायझेशन फंडस्, नॅशनल को. डेव्हलपमेंट व वेअरहाऊस बोर्ड, ह्यांच्या निर्मितीबाबत शिफारशींना एक्झिक्युटिव्ह कमिटीनें पाठिंबा दिला; त्या सर्वांवर सहकारी हितसंबंधांस योग्य प्रतिनिधित्व असावें अशी तिनें सूचना केली आहे.


दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.

म्यूच्युअल कंपन्यांत सर्वांत अधिक बोनस वाटणारी महाराष्ट्रांतील अग्रेसर विमा कंपनी ! !

दि सेन्ट्रल म्यूच्युअल लाईफ इन्शुअरन्स कं. लि.

हयातींतील विम्यास : दरसाल दर हजारीं रु. ७

हयातीनंतरच्या विम्यास: ,, ,, ,, रु. ९

ठिकठिकाणीं प्रतिनिधी नेमणें आहेत.

६७ अपोलो स्ट्रीट फोर्ट, मुंबई — शं. न. आगाशे, मॅनेजिंग डायरेक्टर

'अर्थ' ग्रन्थमाला

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लि.

( शिड्यूल्ड बँक )

प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग

पुणें २. ( टे. नं. २७६३ )

| | |
|---|---|
| अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | रु. ७,२४,९१० |
| खेळतें भांडवल | रु. ७५,००,००० |

मुंबई शाखा:—कॉमनवेल्थ बिल्डिंग, ८२, मेडोज स्ट्रीट, मुंबई १

श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. द्वा. ग. बापट, उपाध्यक्ष.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

श्री. गो. धों. जोगळेकर बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर.

श्री. सी. टी. चितळे मॅनेजिंग डायरेक्टर. टे. नं. २६०७

# अर्थ

बुधवार, ता. २३ फेब्रुवारी, १९५५





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## समाज-विकास योजनांची प्रगति

मुंबई राज्यांतील समाज-विकास-योजना व इतर विकास-विषयक कामें ह्यांच्यासंबंधीं अधिकृत अहवाल प्रसिद्ध करण्यांत आला आहे. त्यावरून असें दिसून येतें कीं ह्या योजनांची प्रगति जितक्या वेगानें व्हावयास पाहिजे तितक्या वेगानें ती होत नाहीं. राज्यांत एकूण ११ समाज-विकास-योजनांचीं कामें चालू आहेत. त्यापैकीं चार योजनांची प्रगति निराशाजनक आहे आणि बाकीच्या सात योजनांचें कामहि फारसें समाधानकारक चाललेलें नाहीं. नॅशनल एक्स्टेन्शन सर्व्हिसच्या २० योजना राज्यांत कार्यान्वित आहेत. त्यांची प्रगति मात्र तुलनेनें बरी आहे. ह्या प्रकारच्या २० योजनांपैकीं ५ कामांत चांगली प्रगति झाली आहे. ९ कामांबद्दल असमाधान व्यक्त करण्यास तरी जागा नाहीं. समाज-विकास योजनांसाठीं करावयाच्या खर्चाची रक्कमहि योग्य त्या प्रमाणांत खर्च झालेली नाहीं. १९५३ च्या ऑक्टोबर महिन्यांत ६ समाज-विकास-योजनांच्या कामाला प्रारंभ करण्यांत आला. ह्या योजनांप्रीत्यर्थ अंदाजपत्रकांत ९० लाख रुपयांची तरतूद करण्यांत आली होती. पण प्रत्यक्ष खर्च मात्र ११,८३,७७२ रुपयेच झाला. नॅशनल एक्स्टेन्शन सर्व्हिसच्या कामांसाठीं अंदाजपत्रकांत जितकी रक्कम मंजूर करण्यांत आली होती तीपैकीं १५·०४ टक्केच रक्कम खर्ची पडली आहे. १९५४ च्या जानेवारी महिन्यांत मुंबई राज्यांत दहा नॅशनल एक्स्टेन्शन सर्व्हिसच्या योजना सुरू करण्यांत आल्या. त्यांपैकीं अहमदाबाद जिल्ह्यांत सुरू करण्यांत आलेल्या योजनेची प्रगति इतर योजनांच्या मानानें चांगली झालेली दिसून येते. १९५४ सालीं सुरू करण्यांत आलेल्या दहा योजनांत कामाच्या प्रगतीच्या दृष्टीनें तिचा पहिला नंबर लागतो.

## सुरत जिल्ह्यांतील सहकारी चळवळ

सुरतेपासून ९ मैलांवर असलेल्या सायन ह्या गांवीं सुरत जिल्ह्यांतील सहकारी संस्थांची दुसरी परिषद् भरविण्यांत आली होती. परिषदेचें उद्घाटन करतांना गुजरात प्रां. कॉं. कमिटीचे अध्यक्ष श्री. कन्हयालाल देसाई म्हणाले कीं, सहकारी चळवळींत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांनीं सहकाराचीं मूलभूत तत्त्वें अमलांत आणण्याचा प्रयत्न केला पाहिजे. दुधाचा पुरवठा करणाऱ्या संस्थांनीं दुधाचा दर्जा व उत्पादन ह्या दोन्ही बाबींकडे लक्ष देणें जरूर आहे. त्याचप्रमाणें, शुद्ध दुधाचा पुरवठा करण्याचें कार्य शहरांप्रमाणेंच खेडेगांवांच्या बाबतींतहि त्यांनीं केलें पाहिजे. सुरत जिल्ह्यांत विणकर व जरीचें काम करणारे कामगार आहेत. ह्या कामगारांच्या सहकारी संस्था स्थापन करण्यात आल्या पाहिजेत. मात्र त्या अशा तऱ्हेनें चालविण्यांत याव्या कीं त्याचा फायदा कामगार व मालक ह्या दोघांनाहि मिळाला पाहिजे. शेतीच्या सहकारी संस्थांनाहि उत्तेजन देण्यांत आलें पाहिजे. सुरत जिल्हा को-ऑपरेटिव्ह बोर्डाचे अध्यक्ष श्री. लल्लुभाई पटेल म्हणाले कीं, सुरत जिल्ह्यांत ८९० सहकारी संस्था आहेत. जिल्ह्यांतील १,९२८ खेड्यांपैकीं ९४ टक्के खेड्यांतून सहकारी संस्था कार्य करीत आहेत. परिषदेंत मंजूर करण्यांत आलेल्या एका ठरावानें सरकारला अशी विनंति करण्यांत आली आहे कीं, सहकारी संस्थांना विक्रीकरापासून व इतर करापासून सूट देण्यांत यावी आणि त्यांना यावी लागणारी ऑडिट फी कमी करण्यांत यावी. दुसऱ्या एका ठरावानें सरकारला असें सुचविण्यांत आलें आहे कीं, सरकारनें बँकांची तालुकावार युनिअन्स स्थापन करावी आणि ती बॉंबे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँकेशीं व डिस्ट्रिक्ट को-ऑपरेटिव्ह बँकेशीं जोडावी.

## ब्रिटनमधील चहाच्या वाढत्या किंमती

ब्रिटनमधील चहाच्या ग्राहकांना वाढत्या किंमती द्याव्या लागत आहेत याबद्दल ब्रिटिश सरकारच्या अन्नखात्याच्या एका प्रवक्त्यानें कॉमन्स सभेंत खुलासा केला आहे. गेल्या कांहीं महिन्यांत ब्रिटनमध्यें चहाच्या किंमती वाढल्याबद्दल मजूर-पक्षाच्या सभासदांनीं अन्नमंत्र्यांवर प्रश्नांचा भडिमार केला. एक मजूर सभासद् म्हणाला कीं, १९५१ सालीं मजूर सरकार अधिकारावर होतें त्यावेळेपेक्षा चहाच्या किंमती दर पौंडामागें ४ शिलिंगानें वाढल्या आहेत. हल्लीं ग्राहकांना पौंडभर चहासाठीं ७ शिलिंग, ६ पेन्स मोजावे लागतात. दुसऱ्या एका मजूर सभासदानें अशी माहिती सांगितली कीं चहाचा व्यापार करणाऱ्या कंपन्यांचा वट्ट नफा १९५४ च्या पहिल्या दहा महिन्यांत १ कोटी, ६५ लक्ष पौंडांनीं वाढला आहे. १९५३ सालीं सबंध वर्षांत तो इतका वाढला नव्हता. ह्या विरोधकांना उत्तर देतांना अन्नखात्याचे सेक्रेटरी डॉ. हिल म्हणाले कीं, ब्रिटनमधील १७६ चहाच्या कंपन्यांनीं इतकी रक्कम नफा म्हणून वाटलेली नाहीं. कर वजा जातां नफ्याची रक्कम ३० लाख पौंडापेक्षाहि कमी आहे. चहा स्वस्त व्हावा म्हणून सरकारी आर्थिक मदत पुन्हां चालू करण्याची सूचना नाकबूल करून ते पुढें म्हणाले कीं, चहाची निर्यात करणाऱ्या देशांनीं निर्यात जकात बसविल्यामुळेंच केवळ चहा महागला हें खरें नाहीं. ब्रिटनमधील ग्राहकानें एकाच दर्जाचा चहा लंडन, कोलंबो अगर कलकत्ता ह्यांपैकीं कोठेंहि घेतला तरी त्याला सारखीच किंमत द्यावी लागेल. भारत व सीलोनमध्यें चहाच्या खपांत बरीच वाढ झालेली आहे. अमेरिकेंतहि चहाचा खप अधिकाधिक होऊं लागला आहे. चहाच्या खपांत जी वाढ झाली आहे, त्यामुळेंच मुख्यत: किंमती वाढलेल्या आहेत.

## वाढत्या बेकारीचे निदर्शक आकडे

डिसेंबर, १९५४ अखेर, भारतांतील वेगवेगळ्या एम्प्लॉयमेंट एक्सचेंजेच्या पटावर नोकरी मागणारांचीं ६,०९,७८० नांवें दाखल होतीं. मुंबई, पश्चिम बंगाल, मद्रास आणि बिहार येथील बेकारीनें सर्वांत उच्चांक गांठला. डिसेंबरमध्यें १,३५,००१ नवीं नांवें नोंदविण्यांत आलीं आणि १४,१७४ बेकारांना काम देण्यांत आलें. रिकाम्या झालेल्या जागा एक्सचेंजकडे कळविल्या जातात, त्यांच्या संख्येंत घट झाली आहे.

## प्रभाकर कंदिलाचा ३० वा वाढदिवस

'ओगले ग्लास वर्क्स लि.' ओगलेवाडी येथील 'प्रभाकर' कंदिलाचा ३० वा वाढदिवस समारंभ ता. ८ रोजीं दुपारीं ४ वाजतां कामगार–निवासस्थानीं श्री. एस्. डी. भट, आय्. सी. एस्., चेअरमन इं. टॅरिफ कमिशन, यांचे अध्यक्षतेखालीं झाला.

### श्री. शंकरराव ओगले ह्यांचें भाषण

श्री. शंकरराव ओगले यांनीं प्रास्ताविक भाषणांत कंदिलाची कल्पना कै. नागूदादा ओगले यांची होती, त्या कामीं पन्नास हजारांचें रोख भांडवल कै. श्रीमंत राजे बाळासाहेब पंत औंध यांनीं दिलें; व कारखाना सुरू केला असें सांगून सन १९१६–२० सालापर्यंत आर्थिक साहाय्य आजचे अध्यक्ष यांचे वडील बंधु श्री. बापूसाहेब भट, यांनीं केलें होतें, म्हणून हे जवळचे असल्यानें यांची निवड केली आहे, असें सांगितलें.

### श्री. पाध्ये ह्यांचें भाषण

कारखान्याचे जनरल मॅनेजर, श्री. काकासाहेब पाध्ये यांनीं कंदिलाचा संक्षिप्त इतिहास निवेदन केला. सन १९२२ सालीं कै. नागूदादास ही कर्ल्पना सुचली व ती अंमलांत आणणें १९२५ सालीं सफळ झालें. ८ फेब्रुवारी १९२५ ला प्रभाकर कंदील बाजारांत आणला. १९२५ ते १९३९ पर्यंत भारतांत दोन कारखाने होते. त्यानंतर कंदिलाचे कारखान्यांची वाढ आठ पर्यंत झाली आहे. यंत्रसामुग्री आलेवर अवघ्या दोन महिन्यांतच कंदील बाहेर आला. त्या कामीं ज्यांचें साहाय्य झालें, त्यांचा उल्लेख केला. १९२९ ते १९३९ यंत्रसामुग्री झिजूं नये म्हणून दररोज फक्त १०० कंदीलच तयार करीत होतों. त्यावेळीं संरक्षण मिळालें नाहीं. दुसऱ्या महायुद्धामुळें सरकारास कारखान्याकडे धांव घ्यावी लागली होती. युद्धकालांत सरकारला सात लाख कंदील पुरविले. शिवाय स्टोव्ह, काचमाल, एनामेल, इत्यादि मालहि पुरविला गेला.

### नवी यंत्रसामुग्री

पुढें यंत्रसामुग्री जुनी झाली. नवीन आणणें जरूर होतें. त्याकरतां मिळणाऱ्या २० लाख रु. भांडवलांतून ५ लाखांची अगदीं नवी कोरी यंत्रसामुग्री कंदिलाकरतां आणली. त्यांतील दोन यंत्रें देशांतील इतर कारखान्यांत नाहींत. नवीन यंत्रामुळें ८ तासांस ८०० वरून २,५०० हजार कंदील तयार होऊं लागले. या बाबतींत श्री. बी. एस्. ऊर्फ शामराव ओगले यांनीं दाखविलेली दूरदृष्टि व परिश्रम वाखाणण्याजोगे आहेत. स्वातंत्र्यानंतर डिसेंबर १९५४ अखेर कंदीलाचे धंद्यास संरक्षण मिळालें. जानेवारी १९५५ पासून संरक्षण काढून घेतलें आहे.

### सरकारला पुरवठा

सरकारी खात्यास कंदील पुरविण्याचीं नियमित कंत्राटें आम्हांस मिळत आहेत. आमच्या कंदिलाचा दर्जा इतर कंदिलापेक्षा निश्चित सरस आहे. कलकत्ता व लंडन येथेंहि कंदिलाची तपासणी होऊन त्यांतहि सरस ठरला आहे.

### कामगारांचा सत्कार

नंतर कंदील कारखान्यांतील जुन्या कामगारांचा सत्कार अध्यक्षांचे हस्तें चांदीची मेडल्स व त्यावर सोन्याची चकती असलेली अशी व शिवाय प्रशस्तिपत्रें देऊन केला. नवीन कामगारांपैकीहि कांहींना प्रशस्ति–पत्रें दिलीं.

### अध्यक्षांचें भाषण

समारोपाचे भाषणांत अध्यक्ष म्हणाले कीं, परदेशांतहि कारखाने २०० वर्षांपूर्वीचे असून त्यांत संशोधन, प्रगति चालू आहे. त्या मानानें आपण मागें आहोंत. दुसऱ्या महायुद्धाचे वेळीं ४०–४५ लहानमोठे धंदे सुरू झाले. कोणताहि धंदा सुरू करतांना त्याची संपूर्ण माहिती घेऊन मगच त्यांत पडावें. आपण निश्चय करून धडाडी, धाडस दाखविलें तर त्यांत यशस्वी होतों असें ओगले बंधूंचें उदाहरण आहे. उद्योगधंदे वाढविले पाहिजेत. या कामीं पांच भागीदार आहेत. (१) भांडवलदार (२) मॅनेजिंग एजंट (३) कामगार (४) गिऱ्हाईक (५) सरकार. या सर्वांचें सहकार्य असेल तर नवीन धंदे सुरू होऊन ते यशस्वी होतील.

कामगारांनीं काम करून कारखाना उदयाला आणला व स्वतःची उन्नति करून घेतली, त्याचप्रमाणें चालकांनीं साहस करून धडाडी, चिकाटी दाखविली त्याबद्दल दोघांचेंहि अभिनंदन करतों. कामगार व मालक यांच्या सहकार्यानें महाराष्ट्रांतील उद्योगधंदे वाढीस लागतील अशी इच्छा व्यक्त करून अध्यक्षांनीं भाषण संपविलें.

कारखान्याचे चेअरमन, श्रीमंत जगन्नाथमहाराज पंडित, यांनीं सर्वांचे आभार मानले. कंदिलाबद्दलची पुस्तिका यावेळीं वाटण्यांत आली.

सेवा, सुरक्षा आणि सौजन्याचें प्रतीक
सारस्वत
को-ऑपरेटिव्ह बँक
लिमिटेड.
अधिकृत भांडवल रु. १०,००,०००
वसूल झालेलें भांडवल रु. ७,२७,३००
रिझर्व्ह रु. ६,०६,०००
ठेवी रु.
बँकेचे सर्व व्यवहार केले जातात.

---

## छोट्या उद्योगधंद्यांना मदत करण्यासाठी कॉर्पोरेशनची स्थापना

छोट्या उद्योगधंद्यांना मदत करण्यासाठीं असलेल्या स्मॉल इंडस्ट्रिअल कॉर्पोरेशनची भारतीय कंपनी कायद्याखालीं एक खाजगी मर्यादित कंपनी म्हणून नोंद करण्यांत आली आहे. भारतांतील लहान प्रमाणावरील धंद्यांच्या प्रश्नांची १९५३ मध्यें पाहणी केलेल्या फोर्ड फाउंडेशनच्या आंतरराष्ट्रीय तज्ज्ञांच्या तुकडीनें केलेल्या शिफारशींत असें कॉर्पोरेशन तयार करण्याची एक शिफारस होती.

या कॉर्पोरेशनचें अधिकृत भांडवल १० लक्ष रुपयांचें राहणार असून, त्याचा भरणा सर्वस्वीं भारत सरकार करणार आहे. खेळत्या भांडवलाची तरतूद करण्यासाठीं सरकार कॉर्पोरेशनला अवश्य तीं कर्जें देईल.

मध्यवर्ती व्यापार व उद्योग खात्यांतील छोट्या प्रमाणावरील धंद्यांचे विकास अधिकारी संचालक मंडळाचे अध्यक्ष राहणार असून, त्या मंडळांत नऊ सदस्य राहतील. डायरेक्टर जनरल सप्लाईज व डिस्पोझल्स आणि अर्थ, रेल्वे व संरक्षण खातीं यांचे प्रतिनिधी संचालक मंडळावर असतील. तसेंच, छोट्या धंद्यांचे आणि बँकांचे प्रतिनिधीहि मंडळावर नेमण्यांत येतील.

## मा. वि. घारपुरे : व्यक्ति आणि कार्य

( लेखकः—पु. ग. काशीकर, लॉर्ड रे इंडस्ट्रियल म्युझियम, पुणें २ )

महाराष्ट्र हा संस्थांचा देश आहे असें स्वर्गस्थ पंडित मदनमोहन मालवीय म्हणत असत व तें सत्य आहे. महाराष्ट्रांतील या संस्थांमध्यें केवळ एकाच व्यक्तीनें आपलें जीवितकार्य समजून संस्था चालवून ती भरभराटीस आणल्याचीं कांहीं उदाहरणें आहेत. त्यांपैकीं क्युरेटर श्री. मा. वि. घारपुरे व त्यांनीं नांवलौकिकास आणलेलें महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालय यांस बराच वरचा क्रम द्यावा लागेल. सन १९३० मध्यें संग्रहालयाचा पुनरुद्धार केल्यापासून अविश्रांत दोन तपें त्यांनीं संग्रहालयाच्या उन्नतीसाठीं परिश्रम केले व जीवनाच्या शेवटच्या क्षणापर्यंत संग्रहालयाचीच चिंता केली. ही दोन तपांची सेवा करीत असतांना त्यांना निरनिराळ्या परिस्थितींतून जावें लागलें व कित्येक प्रसंगीं निराशेचे तडाखे सहन करावे लागले. आशादायक परिस्थिति असतांना मनुष्य साहजिकच उत्साही होऊन अधिक जोमानें काम करूं शकतो. परंतु निराशामय परिस्थितींतहि तितक्याच उत्साहानें काम करणें हें कठीण असतें. श्री. घारपुरे यांच्या संग्रहालयाच्या दीर्घकालीन सेवेंत त्यांना अनेकदां निराशमय परिस्थितींतून जावें लागलें. परंतु निराशा जितकी दारुण तितके ते दुर्दम्य उत्साहानें कामाला लागत. संग्रहालयासाठीं देणग्या व प्रदर्शनीय वस्तु मिळवितांना ही गोष्ट नेहमीं अनुभवाला येत असे. त्यांच्या विनंतीस नकार मिळाल्यानंतर ते स्वस्थ कधींच बसले नाहींत. ज्यांचेकडून संग्रहालयासाठीं कांहीं मिळवावयाचें तेथून संपूर्ण नाहीं तरी निदान अंशतः तरी ती मागणी पूर्ण करून घेतल्याशिवाय ते स्वस्थ रहात नसत. संग्रहालयांत आज जो प्रदर्शनीय वस्तूंचा संग्रह आहे, तो सर्व अशा पद्धतीनें त्यांनीं मिळविलेला आहे. त्यासाठीं संग्रहालयानें खर्च केला नाहीं. संग्रहालयाची आर्थिक स्थितीहि प्रदर्शनीय वस्तूंवर पैसे खर्च करण्यासारखी कधींच नव्हती; आजहि नाहीं. या सर्व संग्रहांत अगदीं क्षुल्लक किंमतीच्या वस्तूंपासून ते रु. ४,००० किंमतीच्या प्रतिकृतीपर्यंत सर्व दर्जाच्या वस्तु आहेत. एकदां त्यांच्या मनानें एकादी वस्तु संग्रहालयासाठीं मिळवावयाची असें ठरविल्यानंतर सारखा त्याच गोष्टीचा ते ध्यास घेत असत व ती मिळविण्याचे बाबतींत प्रयत्नांची पराकाष्ठा करीत असत. या त्यांच्या चिकाटीमुळें प्रत्येक ठिकाणीं त्यांना यश येत असे. कांहीं प्रसंगीं तर दात्याला देणगी देण्याची इच्छा नसतांनाहि केवळ त्यांची ही कमालीची चिकाटी पाहून त्यानें संपूर्ण नाहीं तरी थोडी तरी देणगी दिल्याचीं उदाहरणें आहेत.

### ग्रंथालय

संग्रहालयाच्या ग्रंथालयाचीहि त्यांनीं अशाच पद्धतीनें वाढ केली. ग्रंथालयासाठीं ग्रंथ व नियतकालिकें खरीदण्यासाठीं संग्रहालयाजवळ भरपूर द्रव्य कधींच नसे. केवळ विनंतिपत्रकें पाठवूनच आजचें ग्रंथालय त्यांनीं सजविलें. या ग्रंथालयांत आज जवळजवळ ६,००० ग्रंथ आहेत व त्यांत २५० नियतकालिकें नियमितपणें येत आहेत. ६०–९० शिलिंग किंमतीचे ग्रंथ विनामूल्य त्यांनीं मिळविले आहेत. ग्रंथ मिळविण्याची देखील त्यांची एक विशिष्ट पद्धत होती. प्रथम विनंतिपत्र पाठवून ग्रंथाची विनामूल्य मागणी करावयाची. त्या मागणीस नकार मिळाल्यानंतर मग पत्र लिहून त्यांत विनामूल्य नाहीं तर निदान ५० टक्के किंमत कमी करून ग्रंथ देणेबद्दल विनंति करावयाची. तीहि अमान्य झाल्यास मग निदान २५ टक्के तरी सवलत द्यावी, तुमचा ग्रंथ संग्रहालयाच्या ग्रंथालयास भेट देणाऱ्या वाचकांचे नजरेस येईल, एखाद्या स्थानिक नियतकालिकांत त्यावर अभिप्राय प्रसिद्ध करूं व अशा प्रकारें तुमच्या ग्रंथास प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष प्रसिद्धि देण्याची आम्हीं पराकाष्ठा करूं, असें त्या पत्रांत लिहावयाचें. परंतु इतकी संपूर्ण पद्धत त्यांना थोड्या बाबतींत अवलंबावी लागत असे. कारण, पुष्कळवेळां विनंतीनुसार वाङ्मय मिळत असे. उद्योगधंद्येविषयक वाङ्मय विद्यार्थ्यांच्या हातांत पडून त्यांना अभ्यासावयास मिळावें म्हणून अशा प्रकारचें वाङ्मय मिळवून ते विद्यार्थ्यांना वांटावयाचा नवीनच उपक्रम त्यांनीं अलीकडे सुरू केला होता. टाटा आयर्न अँड स्टील कंपनीनें प्रकाशित केलेल्या लोखंड व पोलाद या विषयांवरील पुस्तकाच्या इंग्रजी, मराठी व हिंदी ४,००० प्रती त्यांनीं शाळांतील विद्यार्थ्यांस वांटणेंकरितां मिळविल्या व वांटल्या देणगी मागावयाची ती देखील घसघशीत मागावी, त्यांत कंजूषपणा नसावा, असें ते म्हणत. दात्याला देखील देणगी मागणाराची विशाल दृष्टि पटत असे व तो त्याचे पदरांत भरण्यास देणगी टाकीत असे. यु. एस्. इन्फर्मेशन सर्व्हिस, मुंबई यांचेकडून उत्तम रंगीत छपाई केलेली ३६ मण वजनाचीं ५,०००–६,००० पुस्तकें आणवून मुक्त हस्तानें विद्यार्थ्यांस व संग्रहालयाकडील प्रेक्षकांस वांटलीं. ग्रंथालयाकडे येणाऱ्या नियतकालिकांची वार्षिक वर्गणी जवळजवळ रु. ५,००० होईल. इतकी ही वाङ्मय संपत्ति समाजाच्या उपयोगी पडावी व त्याचा फायदा त्यांनीं घेऊन औद्योगिक प्रगति साधावी ही त्यांची तळमळ असे. यासाठीं स्थानिक अभ्यासू कारखानदारांकडे, व्यापाऱ्यांचेकडे त्याचप्रमाणें कांहीं अभ्यासू सद्गृहस्थांचेकडे संग्रहालयाकडे येणारें वाङ्मय ते वेळोवेळीं संग्रहालयाच्या सेवकांमार्फत पाठवीत असत व परत आणवीत असत. उद्देश असा कीं, परिश्रम करून जमविलेल्या वाङ्मयाचा उपयोग व्हावा.

संग्रहालयामुळें ग्रंथालय वाढतें व ग्रंथालयामुळें संग्रहालय वाढते; दोन्ही परस्परपूरक आहेत असें ते म्हणत असत.

### संग्रहालयांतील इतर शाखा

संग्रहालयाची प्रत्येक शाखा त्यांनीं अशाच प्रकारें प्रारंभ करून वाढविली आहे. कॉमनवेल्थ इमारतींत-असलेलें व्यापारसंवर्धनगृह, त्याच्याच मागील दिवाणखान्यांत असलेला शेती व जंगलविभाग व त्याच्याच अनुषंगिक शेतीशिक्षण वर्ग हीं त्याचीं उदाहरणें होत. हिंदी कलाकौशल्य हा त्यांचा एक आवडीचा विषय होता व भारतांतील सर्व उत्तमोत्तम फळांचे अत्युत्कृष्ट नमुने एकत्र करून त्यांचा एक मोठा संग्रह करावा अशी त्यांची मनीषा होती. त्याचबरोबर, आपल्या कारागिरांना उपयोगी पडेल त्या विषयासंबंधीं वाङ्मयाहि तेथें जमवून ठेवावें व या दृष्टीनें थोडासा आरंभहि त्यांनीं केला होता. मुंबईच्या सर दोराबजी टाटा ट्रस्टकडून रु. ८,००० देणगी म्हणून मिळवून त्यांतून दुर्मिळ अशीं देशी व परदेशी पुस्तकें त्यांनीं या हिंदी कलाकौशल्य विभागांत ठेविलीं आहेत.

हस्तकौशल्य हा असाच एक त्यांचा अत्यंत आवडीचा विषय होता. संग्रहालयाचे अगदीं प्रारंभापासून एक लहानसें वर्कशॉप आहे व त्यांतून लहानलहान व कित्येक वेळीं शोकेसेससारख्या मोठ्या मोठ्या वस्तु देखील त्यांनीं स्वतः डिझाइन बसवून तयार करवून घेतल्या. असे डिझाइन तयार करून नवीन नवीन लहानमोठ्या वस्तू तयार करणें हा त्यांचा एक छंद असे.

गेल्या दोन वर्षांपासून त्यांनीं प्रदर्शनीय पेट्या (Portable display cases) तयार करावयास प्रारंभ केला होता. संग्रहालयाकडील व्याख्याता ज्या वेळीं शिक्षणसंस्थेंत व्याख्यान द्यावयास जातो त्या वेळीं त्याला सहज बरोबर नेतां येईल अशी ही लहान पेटी आहे. यामध्यें त्या त्या विषयासंबंधींच्या वस्तू क्रमवार व्यवस्थित मांडून ठेविलेल्या आहेत. लाख, रेशीम, लोखंड, नारळ, धायपात, अशा २०–२५ निरनिराळ्या उद्योगधंदे विषयावरील प्रदर्शनीय पेट्या त्यांनीं आपल्या कल्पनेनें बसवून तयार करून त्यांचा उपयोग करणेस प्रारंभ केला. आक्टोबरमध्यें महाबळेश्वर येथें शिक्षणतज्ज्ञांचा मेळावा भरला होता. त्यावेळीं श्री. घारपुरे यांना मुद्दाम आमंत्रण देऊन बोलाविण्यांत आलें होतें. जातांना त्यांनीं अशा प्रकारच्या २–३ विषयांवरील प्रदर्शनीय पेट्या व इतर साहित्य बरोबर नेलें होतें व त्याचे साहाय्यानें त्यांनीं त्या विषयावर व्याख्यानें दिलीं. श्रोतृवर्गास ही दृक्-शिक्षणाची पद्धति इतकी पसंत पडली कीं त्यापैकीं कांहीं शिक्षकांनीं अशा पेट्या संग्रहालयाकडून नंतर त्यांचे शिक्षणाचे कामासाठीं घेतल्या.

नुकतेंच पुण्यांत येऊन गेलेले फुलब्राइट स्कॉलर प्रो. स्मिथ यांनीं संग्रहालयास भेट दिली त्यावेळीं त्यांना या पेट्या दाखविण्यांत आल्या. त्यांनीं त्या पाहून अत्यानंद व कौतुक प्रकट केलें.

**प्रदर्शनें : आवडीचा व हातखंडा विषय**

प्रदर्शनें हा तर त्यांचा अत्यंत आवडीचा विषय होता व त्या विषयांतील त्यांचा अधिकारहि फार मोठा होता. प्रदर्शन म्हणजे घारपुरे व घारपुरे म्हणजे प्रदर्शन असें त्यांचे स्नेही व चहाते म्हणत असत. १९२० ते १९३० या सालांत पुण्यांत गणेशोत्सवांत व प्रतिवर्षीं टिळक मंदिरांत ते प्रदर्शनें भरवीत असत. त्यानंतर संग्रहालयाच्या विद्यमानें १९३३, १९३५, १९३७ व १९३९ सालीं चार मोठीं आंतर–प्रांतीय प्रदर्शनें त्यांनीं भरविलीं व तीं यशस्वी करून दाखविलीं. हीं मोठीं प्रदर्शनें नुसती यशस्वी झालीं, एवढेंच नव्हे तर आर्थिक दृष्ट्याहि त्यांनीं तीं यशस्वी करून दाखविलीं. या प्रदर्शनाची आर्थिक यशस्विता केवळ त्यांचे एकट्याचे जबाबदारीवरच अवलंबून असे. प्रदर्शनाचें त्यांनीं एक विशिष्ट तंत्र बसविलें होतें, त्यांचें स्वतःचे त्या बाबतींतील स्वतंत्र अर्थशास्त्र असे व प्रत्येक बाब स्वयंपूर्ण व स्वावलंबी करण्याची ते अतिशय खटपट करीत. प्रदर्शन–प्रेक्षकाचीं तिकिटें छापणेसाठीं होणारा कागद व छपाई यांचा खर्च देखील परस्पर निघावा म्हणून त्यावर ते जाहिराती छापीत असत व पैसे मिळवीत असत. इतकी त्यांची दृष्टि सूक्ष्म असे व या कारणामुळें त्यांनीं भरविलेल्यापैकीं प्रत्येक प्रदर्शन सर्व दृष्टीनें यशस्वी झालें. १९३९ चे प्रदर्शनानंतर मोठ्या प्रदर्शनाकडील आपली दृष्टि त्यांनीं खास शैक्षणिक लहान–लहान प्रदर्शनांकडे वळविली. कृत्रिम फुलांचें प्रदर्शन, पेटंट व शोध प्रदर्शन, विद्यार्थी व त्याचीं हत्यारें, अमेरिकेंतील सात महिने, आंतरराष्ट्रीय पुस्तक प्रदर्शन, अशीं प्रदर्शनें त्यांनीं भरविलीं व शिक्षण दृष्ट्या तीं अत्यंत यशस्वी झाली. यांपैकीं पेटंट प्रदर्शनाचे उद्घाटनासाठीं भारत सरकारच्या पेटंट कचेरीचे अधिकारी श्री. के. रामा पै हे आले होते. त्यांनीं आपल्या भाषणांत श्री. घारपुरे यांच्या कल्पनाचातुर्याबद्दल मुक्तकंठानें त्यांची स्तुति केली होती. श्री. घारपुरे यांनीं भरविलेलें जगांतील तें दुसरें पेटंट प्रदर्शन असावें. ए लेसन फ्रॉम दि फेस्टिवल ऑफ ब्रिटन व इंडिया रबर एक्झिबिशन या प्रदर्शनांचें काम त्यांनीं अलीकडे हातीं घेऊन चालू केलें होतें.

(अपूर्ण)

स्थापना १९३६

युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा

[ शेड्यूल्ड बँक ]

हेड ऑफिस—पॅलेस स्ट्रीट, चिरमुले निकेतन, सातारा.

शाखा–मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नासिक, बार्शी व लोणंद

ता. ३१-१२-५३ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| रिझर्व व इतर फंडस् | रु. | १,९९,००० |
| ठेवी | रु. | ७१,६८.००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ८६,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष | दोन वर्षें | तीन वर्षें | ५ वर्षें |
|---|---|---|---|
| रु. २-८-० | रु. २-११-० | रु. ३-०-० | रु. ३-८-० |

दहा अगर अधिक वर्षें रु. ४-०-० (चार फक्त)

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १-८-० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | " | १-०-० |
| चालू डिपॉझिट | " | ०-८-० |

सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.

शं. ह. साठे, बी. ए., एल्एल्. बी., चेअरमन




अन्नाचें रहस्य




बेडेकर मसाले, लोणचीं, पापड

ह्या वस्तूंनीं आपल्या जेवणांत गोडी वाढते व समाधान वाटतें.

★ व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. ★

दुकानें—मुगभाट, ठाकूरद्वार, दादर, कोट, परळ

— द. ना. हेजीब, ३० शुक्रवार पेठ, पुणें —

## श्री. जोशी ह्यांची इंजिनिअर्सना सूचना

दि इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स (इंडिया) ची ३५ वी वार्षिक सभा हैद्राबाद येथें २० फेब्रुवारी रोजीं भरली होती. परिषदेचे अध्यक्षस्थानीं मुंबईचे सुप्रसिद्ध तज्ज्ञ इंजिनिअर व कॉन्ट्रॅक्टर प्रो. एस. बी. जोशी हे होते. अध्यक्षांनीं आपल्या भाषणांत, इंजिनिअर्सनीं क्युसेक्स, किलोवॅट्स, इत्यादिमध्यें गुंतून न रहातां, व्यापक क्षेत्रांतील वैचारिक क्रांतीकडे लक्ष पुरवावें असें सुचविलें. "आपल्या कामाचे मागील ध्येयवाद लक्षांत घेऊन आपण कसोशीनें काम केलें तर तें अधिक चांगलें होईल. समाजवादी सरकारी धोरणाच्या यशस्वितेस इंजिनिअर्सनीं कर्तव्यनिष्ठापूर्वक हातभार लावावयाचा असून, त्यांतून निर्माण होणारी सरकारी यंत्रणा कार्यक्षमतेनें चालविण्याची मोठी जबाबदारी इंजिनिअर्सवरच पडणार आहे. इंजिनिअर्सचा कामगारांशीं घडोघडीं प्रत्यक्ष संबंध येतो. सरकारी उद्योगांची आखणी व उभारणी त्यांनींच करावयाची आहे. खाजगी इंजिनिअरिंग उद्योगांचें नियमन इंजिनिअर्सच्या हातींच येणार आहे. ह्या सर्व कारणांमुळें, नव्या समाजवादी धोरणाच्या अनुरूप सामाजिक इमारत उभारण्याचे बाबतींत इंजिनिअर्सवर फार मोठी जबाबदारी आहे." असा त्यांच्या भाषणाचा मथितार्थ आहे. ही जबाबदारी पार पाडण्याचे कामीं त्यांनीं इंजिनिअर्सना केलेल्या सूचना अत्यंत महत्त्वाच्या आहेत. श्री. जोशी हे राष्ट्रीय वृत्तीचे, यशस्वी तज्ज्ञ इंजिनिअर म्हणून प्रसिद्ध आहेत व हिंदी यंत्रसामुग्रीच्या वापरासाठीं आणि परदेशी पदव्यांचें मलतें महत्त्व कमी करण्यासाठी ब्रिटिश राजवटींतहि त्यांनीं इंजिनिअर्सच्या संघटनांतून कसून प्रयत्न केलेले आहेत. राष्ट्राच्या ध्येयाशीं एकरूप होऊन, त्या ध्येयासाठी सर्वांनीं झटण्याचा त्यांचा संदेश हितकारक ठरेल, अशी खात्री आहे.

---

### महाराष्ट्रांतील बँकर्सच्या परिषदेचा रिपोर्ट

दि डेक्कन बँक्स असोसिएशन व दि पूना बँकिंग असोसिएशन ह्यांच्या विद्यमानें पुणें येथें २ व ३ ऑक्टोबर रोजीं महाराष्ट्रांतील बँकर्सची परिषद भरविण्यांत आली होती. स्वागताध्यक्ष श्री. के. पी. जोशी ह्यांच्या भाषणानंतर परिषदेचें उद्घाटन श्री. हिरे ह्यांनीं केलें व श्री. वर्दे हे अध्यक्षस्थानीं होते. महाराष्ट्रांतील ठिकठिकाणच्या सुमारें ७० बँकर्सनीं परिषदेंत भाग घेतला. शेड्यूल्ड व बिगर-शेड्यूल्ड बँका, बँकिंग अवार्ड, बँकिंग कंपनीज ॲक्ट, लायसेन्स्ड व नॉन-लायसेन्स्ड बँक्स, कर्जवसुली व कोर्टकचेऱ्या, गुमास्ता कायदा, इं. डि. ॲक्ट, सहकारी प्रयत्नांची आवश्यकता, महाराष्ट्रांतील बँकांची मध्यवर्ती संघटना, इत्यादि विषयांवर परिषदेंत चर्चा झाली. श्री. जोशी, श्री. हिरे व श्री. वर्दे ह्यांचीं भाषणें व परिषदेंतील चर्चा ह्यांचा गोषवारा प्रस्तुत अहवालांत देण्यांत आला असून शेवटीं उपस्थित बँकर्सची यादी दिलेली आहे. १६ पृष्ठांच्या ह्या अहवालावरून परिषदेच्या यशाची कल्पना येते.

---

**कृत्रिम हिरे तयार होऊं लागले**—जनरल इलेक्ट्रिक कंपनी ह्या अमेरिकन कंपनीला कृत्रिम हिरे तयार करण्यांत यश आल्याचें समजतें. हिऱ्यांचा आकार मात्र लहान आहे. आतांपर्यंत तयार झालेल्या सर्वांत मोठ्या कृत्रिम हिऱ्याचें वजन एक दशांश कॅरेट आहे. कृत्रिम हिरे इतके कठीण असतात, कीं त्यांच्या साह्यानें खऱ्या हिऱ्यांवरहि रेषा काढतां येतात.


# भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

## मुख्य कचेरी:—भोर, जि. पुणें.

शाखा:—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ७१,६०० |

## बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.

रावसाहेब य. द. खोले. — श्री. चं. रा. राठी.

श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एलएल्. बी. — श्री. घा. ग. घंडुके.

सरकारी रोखे खरेदी-विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी:—बुधवार घ. नं. २६१-६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

वाय. एस. जोशी, अ. मॅनेजर. — एन्. व्ही. पांडव, मॅनेजर



## —नियोजन—

आर्थिक नियोजनानेंच
नवभारताची प्रगति साध्य होत आहे.

—आपणहि—

वेस्टर्नचे योजनापूर्वक विमे
घेऊन आपलें व आपल्या कुटुंबियांचें आर्थिक
स्वातंत्र्य व सौख्य निश्चित केलें
पाहिजे.

अधिक माहिती शाखाधिकारी आनंदानें देतील
आज भेटा अगर लिहा.

—फोन नं. ३४०१—

# वेस्टर्न इंडिया विमा कं. लि. सातारा

पुणें शाखा:—वेस्टर्न इंडिया हाऊस, लक्ष्मी रस्ता, पुणें २

## मॉस्कोमधील घडामोडींची आर्थिक पार्श्वभूमि

रशिआंत झालेल्या राजकीय घडामोडींविषयीं नेहमींप्रमाणें नाना प्रकारचे तर्क करण्यांत येत आहेत. तथापि, रशिआचे माजी पंतप्रधान मि. मॅलेन्कोव्ह ह्यांच्या राजीनाम्यानंतर लगेच चीन व रशिआ ह्यांच्या दरम्यान परस्पर मदतीचा व्यापारी करार झाला ही गोष्ट सूचक मानण्यांत येत आहे. ह्या व्यापारी करारांत उभयतां देशांतील व्यापाराची वृद्धि करण्याचें घोषित करण्यांत आलें आहे. करारांत ज्या मालाची देवघेव करण्याचें ठरलें आहे, त्यावरून असें दिसतें कीं, चीन व रशिआ ह्या दोन्हीं राष्ट्रांनीं भारी कारखाने वाढविण्याचें धोरण स्वीकारलेलें आहे. ह्यापूर्वी चीनकडून रशिआला ताग, चहा, कच्चें रेशीम व वनस्पति-तेलें अशा प्रकारचा कच्चा माल मिळत असे पण नव्या करारानें टिन, टंगस्टेन, चीनकडून ह्यासारखे महत्त्वाचे धातू रशिआला मिळणार आहेत. उलटपक्षीं, रशिआ चीनमध्यें आणखी १५ कारखाने उभारणार आहे. ह्या कारखान्यांचें स्वरूप मात्र जाहीर झालेलें नाहीं. रशिआला चीनकडून मिळणारे वरील धातू उत्तम प्रतीचे पोलाद बनविण्यास जरूर असतात. चीननें आखलेल्या पंचवार्षिक कार्यक्रमांत ६०० नव्या औद्योगिक योजना आहेत. त्यांपैकीं २२ योजना यांत्रिक हत्यारें तयार करण्याच्या आहेत. ह्या योजनांना लागणारें विविध प्रकारचें यंत्रसाहित्य रशिआकडून चीनला मिळणार आहे. अर्थात् हें साहित्य चीनला द्यावयाचें म्हणजे रशिआला ग्राहकांना हरघडी लागणाऱ्या वस्तूंचें उत्पादन त्याचवेळीं वाढविणें शक्य झालें नसतें. मि. मॅलेन्कोव्ह ह्यांचें धोरण चीनची भारी कारखानदारी वाढविण्यास अनुकूल नव्हतें असें म्हणतात. उलटपक्षीं, नवे पंतप्रधान मि. बुल्गॅनिन व कम्युनिस्ट पक्षाचे चिटणीस मि. क्रुश्चेफ चीनचें औद्योगिक सामर्थ्य वाढविण्यास जोर देत होते.

---

## अमेरिकेंत स्विस घड्याळांवर नियंत्रण

उत्कृष्ट व स्वस्त घड्याळाबद्दल स्वित्झरलंड सुप्रसिद्ध आहे. इतर औद्योगिक राष्ट्रांना स्विस धंद्याबद्दल हेवा वाटावा, अशीच परिस्थिति आहे. अमेरिकेनें स्विस घड्याळांच्या आयातीवरील जकात खूपच वाढविली आहे. लष्करी खात्यांना घड्याळें व तत्सम यंत्रें ह्यांची फार मोठ्या प्रमाणावर गरज भासते आणि म्हणून अमेरिकन घड्याळांचा धंदा सुधारणें अमेरिकेच्या संरक्षणाच्या दृष्टीनें तेथील सरकारला आवश्यक वाटत आहे. आज अमेरिकन कारखानदार घड्याळांच्या कांहीं सुट्या भागांसाठी स्वित्झरलंडवर अवलंबून आहेत. अमेरिकेंतील घड्याळांच्या धंद्याचा चार-पंचमांश भाग स्विस घड्याळांनीं व्यापलेला आहे आणि स्वित्झरलंडच्या घड्याळांच्या उत्पादनापैकीं एक-तृतीयांश उत्पादनाचा अमेरिकेंत खप होतो.

---

**प्रवासी व मालवाहू बोट**—येत्या जून महिन्याच्या सुमारास विशाखापट्टम येथील बोट बांधण्याच्या कारखान्यांत ६,००० टन वजनाची बोट तयार होईल. ह्या बोटींत प्रवासी नेण्याची व मालवाहतुकीची, अशा दोन्ही सोयी करण्यांत येणार आहेत. ६२० प्रवासी व ४,००० टन माल बोट नेऊं शकेल.

## व्याज आकारणीचे पुस्तकास पारितोषक

पुणें जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे डायरेक्टर बोर्डानें बँकेचे एजंट श्री. कृष्ण गोपाळ घाटपांडे यांना व्याज आकारणीचें पुस्तक (विस्तृत जंत्रीसह) लिहून प्रसिद्ध केल्याबद्दल पन्नास रुपयांचें रोख पारितोषक देऊन त्यांचें अभिनंदन केलें आहे.

भारताचे अर्थमंत्री, सर चिंतामणराव देशमुख यांचेकडूनहि वरील पुस्तक पाहून समाधान झालें असल्याचें पत्र श्री. कृ. गो. घाटपांडे यांना आलें आहे.

(मिळण्याचें ठिकाणः- वडगांव स्टेशन, मध्यरेल्वे, जिल्हा पुणें. मूल्य दोन रुपये. ट. ख. निराळा)

## राहुरी येथील सो. ट्रेनिंग क्लास रिझल्ट

गेल्या डिसेंबरमध्यें राहुरी येथें झालेल्या सोसायट्यांच्या सेक्रेटरी ट्रेनिंग क्लासाच्या परीक्षेंत खालील सेक्रेटरी उत्तीर्ण झाले आहेत.

**१ ला वर्गः**—१ मोहिते व्ही. बी., २ परीट एन्. बी.

**दुसरा वर्गः**—१ आढाव पी. पी., २ भवर एस्. डी., ३ भारदे आर. डी., ४ द्विवे आर. आर., ५ होंडे एन्. वाय., ६ कुलकर्णी व्ही. इ., ७ कोकणे बी. एस्, ८ लोंढे एम्. एम्., ९ मगर जे. एस्. १० मुळे एस्. बी., ११ पाटेकर आर. डी., १२ राजहंस एम्. डी. १३ सावंत एम्. एस्., १४ सरोदे एम्. वाय., १५ ताम्हाणे एम्. एस्.

**पास वर्गः**—१ औटी. एन्. के., २ बिडवे आर. जी., ३ आंबेकर एस्. पी., ४ ढेंगळे बी. आर., ५ द्विवे ए. जी. ६ देशपांडे पी. डब्ल्यू, ७ पाटील एल्. व्ही., ८ सय्यद ए. सी., ९ शिरसाट एम्. आर., १० शिरसाट आर. बी., ११ शिरसाट बी. जे., १२ सुकाळकर जी. बी., १३ सोनवणे वाय. बी., १४ ताम्हाणे पी. एस, १५ येवले बी. डी.

---

**धारवाड-खानदेशच्या तुपाशीं अमेरिकन तुपाची स्पर्धा ?**

अमेरिकन सरकारजवळ लोण्याचा फार मोठा साठा पडून आहे. त्या लोण्याचें तूप करून तें भारत, पाकिस्तान, इत्यादि देशांत विकण्याचा अमेरिकन सरकारचा विचार आहे. सरकारजवळ २६ कोटी, ४० लक्ष पौंड लोणी शिल्लक आहे. रशिआ लोणी विकत घेण्यास तयार आहे, पण अमेरिकन लोण्यावर रशिया पुष्ट होणें अमेरिकन सरकारला पटत नाहीं. डबाबंद अमेरिकन तूप लवकरच बाजारांत मिळूं लागल्यास नवल नाहीं. किमान दराखाली भाव गेल्यास सरकार लोणी विकत घेतें, पण तें सांठत जातें, त्यावर ही उपाययोजना केलेली आहे.

५० वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान

☆ सरदारगृह ☆

प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी
लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टीची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था
सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४, येथें प्रसिद्ध केलें.